
## सहवेदना

### विजय कदम



**सांगली :** वारणाली रोड विश्रामबाग येथील विजय रामचंद्र कदम (४७) भोसे ता. मिरज यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, भाऊ, असा परिवार आहे. राजेंद्र कदम यांचे ते बंधू व दिपक कदम यांचे चुलतबंधू होत.

### गुलाब मुल्ला



**ऐतवडे बुद्रुक :** वाळवा तालुक्यातील ऐतवडे बुद्रुक येथील ज्येष्ठ नागरिक गुलाब काशीम मुल्ला (९५) त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी,सुना नातवंडे ,परतवंडे असा परिवार आहे. जियारत ९ नोव्हेंबर रोजी सकाळी नऊ वाजता आहे.

### सोनुबाई पाटील



**सांगली :** येथील श्रीमती सोनुबाई आप्पासाहेब पाटील रा. पाटील टॉवर गावभाग यांचे वयाच्या १०९ व्या वर्षी वृध्दापकाळाने बुधवारी निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# पोपट खोत अनंतात विलीन

## लोणारवाडीत अंत्यसंस्कार : मध्यप्रदेशात कर्तव्यावर असताना अपघाती वीरमरण

वार्ताहर
रांजणी

लोणारवाडी (ता. कवठमहांकाळ) येथील भूमिपुत्र व भारतीय सैन्य दलातील जवान हवलदार पोपट भगवान खोत (३५) यांना जबलपूर मध्यप्रदेश येथे कर्तव्यवावर असतांना अपघाती वीरमरण आले. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात, शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

भारत माता की जय, वीर जवान तुझे सलाम आदी घोषणांस देत फुलांनी व तिरंगा ध्वजाने सजविलेल्या भारतीय सैन्य दलाच्या वाहनातून अंत्ययात्रा गावातून काढण्यात आली. खोत कुटुंबियांना अश्रू अनावर झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, बहीण, मुले असा परिवार आहे.

शहीद पोपट भगवान खोत यांना भारतीय सैन्य दलाच्या बेळगाव मधील मराठा लाईट इंफिंट्री जवानांनी बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना दिली. पोलिस प्रशासनातर्फे मानवंदना देण्यात आली.

कवठेमंकाळ तासगाव मतदार संघाच्या आमदार सुमनताई पाटील , प्रांताधिकारी उत्तम दिघे तहसीलदार सौ. अर्चना कापसे, पी. आय. ज्योतीराम पाटील, सागर गोडे तसेच बेंगलोर पॅरा १३ चे कमांडींग ऑफिसर सुभेदार मेजर तोडकर व कर्नल अजय नायर, बेळगाव रेजिमेंटचे अधिकारी, सैनिक कल्याण कार्यालयाचे संचालक, सांगली माजी सैनिक पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर भोसले ,मॅनेजर बापूसाहेब खोत , शंतनू सगरे लोणारवाडीचे सरपंच अजित खोत, पोलीस पाटील, सचिन खोत, प्रभाकर खोत, प्रकाश खोत एकनाथ खोत, दत्तात्रय खोत, आदींनी पार्थिवावर पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.



**रांजणी : लोणारवाडी येथे जवान पोपट खोत यांच्या पार्थिवास भडाग्नी देताना मुलगा**

# एसटी बसला ट्रॅव्हल्सची धडक

## चालकावर गुन्हा : शालेय विद्यार्थिनी जखमी : १५ हजारचे नुकसान

प्रतिनिधी
शिराळा

शिराळा येथे एसटी बसला भरधाव वेगाने ट्रॅव्हल्सची धडक बसली यामध्ये एक शालेय विद्यार्थीनी जखमी झाली असून या प्रकरणी ट्रॅव्हल्सचा चालक संभाजी दगडू मोसमकर (वय३९) रा. ओकोली (ता. शाहूवाडी) याच्यावर शिराळा पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची फिर्याद एसटी चालक सुनील रघुनाथ कुंभार (वय ४८) रा वाकुर्डे बु। (ता शिराळा) यांनी शिराळा पोलिसांत दिली आहे. सदरचा गुन्हा बुधवार दिनांक ०८ रोजी सकाळी सात वाजता घडला आहे.

याबाबत शिराळा पोलीस ठाण्यातून मिळालेली माहिती अशी की, सुनील कुंभार हे क्रमांक एम एच ११ बी एल ९४३८ ही वाकुर्डे ते शिराळा मुक्कामी एसटी बस सकाळी शालेय विद्यार्थी व प्रवासी घेवून शिराळ्याकडे येत होते. सदरची एसटी शिराळा गावात लोहार गल्लीजवळ सकाळी सात वाजण्याच्या सुमारास आली. यावेळी लोहार गल्लीमधील कॉर्नरच्या वळणावर ज्योर्तिलिंग ट्रॅव्हल्स (एम. एच. ०३ डिव्ही ५०२०) ही गाडी घेऊन भरधाव वेगाने संशयित आरोपी चालक संभाजी मोसनकर शिराळा ते बांबवडे कडे घेवून जात असताना निष्काळजीपणाने लोहार गल्ली कॉर्नरच्या वळणावर फिर्यादीच्या बसला धडक दिली. यामध्ये सोनाली वासुदेव गुरव (व १८ वर्षे) रा. वाकुर्डे खुर्द (ता.शिराळा) हि विद्यार्थ्यांनी जखमी झाली आहे. यामध्ये दोन्ही गाड्यांचे १५००० रुपयांचे नुकसान झाले. गुन्हा शिराळा पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आला असून तपास हवालदार कुंभार करत आहेत.

# कुपवाडला सुऱ्याचा धाक दाखवून उद्योजकाला लुटले

प्रतिनिधी
कुपवाड

कुपवाड शहराला जोडणाऱ्या सावळी ते कानडवाडी रस्त्यावर दुचाकीवरुन जाणाऱ्या एका उद्योजकाला पाठीमागून कारमधुन आलेल्या अज्ञात तिघा हल्लेखोरांनी भररस्त्यात अडवून धारदार सूऱ्याचा धाक दाखवत लाथाबुक्क्यानी बेदम मारहाण करून तब्बल दोन लाखाला लूटल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे.

हल्लेखोरांच्या मारहाणीत उद्योजक निलेश रामजी पटेल (रा.विद्यानगर, मिरज. मूळगाव आरग) हे किरकोळ जखमी झाले आहेत. हल्लेखोरांनी पटेल यांच्या पॅन्टच्या दोन्ही खिशात ठेवलेले दोन लाख रुपये जबरदस्तीने हिसकावून घेऊन कारसह पळ काढला आहे. याबाबत कुपवाड पोलिसात नोंद झाली असून जखमी पटेल यांच्या फिर्यादीनुसार पोलिसांनी अज्ञात तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. लूटमारीचा हा प्रकार मंगळवारी भरदिवसा घडल्याने कुपवाड परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे.

याबाबत पोलिसांच्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास उद्योजक निलेश पटेल हे त्यांचा ऑपरेटर कपिल कुमार यांना सोबत घेवून दुचाकीवरुन सावळीतून कानडवाडीकडे निघाले होते.

यावेळी पाठीमागून भरधाव आलेल्या चारचाकी वाहन चालकाने पटेल यांच्या दुचाकीसमोर येऊन गाडी थांबवली. चारचाकीतून उतरलेल्या तिघांपैकी एकाने पटेल यांना धारदार सुऱ्याचा धाक दाखविला तर दोघांनी लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

या मारहाणीत पटेल किरकोळ जखमी झाले आहेत.संशयित तिघांनी जखमी पटेल यांच्या पॅन्टच्या दोन्ही खिशात ठेवलेले दोन लाख रुपये जबरदस्तीने काढून घेऊन संशयितांनी काळ्या रंगाच्या चारचाकीतून पळ काढला. भररस्त्यात अचानक घडलेल्या प्रकाराने भेदरलेल्या पटेल यांनी आरडाओरडा केला.

हल्लेखोरांना पकडण्याचा प्रयत्न केला. पण, असफल ठरला. घडलेल्या प्रकारानंतर उद्योजक पटेल यांनी कुपवाड पोलिस ठाण्यात धाव घेवून फिर्याद दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास कुपवाड पोलिस करीत आहेत.

## पौलीस डायरी

### बोलवाडमध्ये सासऱ्याकडून जावयाला मारहाण

**मिरज :** बोलवाड येथे मुलीचा सांभाळ करीत नसल्याचा आरोप करत सासऱ्याने जावयाला घरात घुसून मारहाण केली. यावेळी प्लॅस्टीकची खुर्ची पाठीत घातल्याने जावई जखमी झाला आहे. याप्रकरणी राकेश श्रीकांत दबडे (वय ३३) यांनी मिरज ग्रामीण पोलिसात तक्रार दिली असून, संशयीत सासरा अर्जून रायमाने (रा. समतानगर, मिरज) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

अर्जून रायमाने याच्या मुलीशी राकेश याचा विवाह झाला आहे. मंगळवारी मध्यरात्री तू माझ्या मुलीला निट का वागवत नाहीस, असे म्हणत जावयाला शिवीगाळ करुन कॉलर पकडली. त्यानंतर छातीवर मारहाण करत नखांनी ओरबडले. यावेळी बाजूस असलेली खुर्ची घेऊन पाठीत मारली. या मारहाणीत जावई जखमी झाला. जावयाने मिरज ग्रामीण पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी संशयीत सासऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दुर्वा कुरणेचा मृत्यू वृषाली चव्हाणवर गुन्हा

**शिराळा :** कांदे (ता.शिराळा) येथे दुर्वा राजेंद्र कुरणे (वय, ५ रा. प्राध्यापक कॉलनी शिराळा) हिच्या मृत्यू प्रकरणी वृषाली करणसिंग चव्हाण रा.प्राध्यापक कॉलनी शिराळा यांच्यावर शिराळा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. याबबत राजेंद्र ऊर्फ बंडा विष्णु कुरणे रा.प्राध्यापक कॉलनी शिराळा यांनी फिर्याद दिली आहे.

ही घटना १५ नोव्हेंबर २०२२ रोजी रोजी सायंकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास घडली होती. याबाबत शिराळा पोलिसांनी दिलेली माहिती अशी,चव्हाण यांच्या नांवे व देखभालीची जबाबदारी असलेल्या शेडच्या जाळीस इलेक्ट्रीकचा करंट जोडलेला होता. त्याची माहिती तिथे असणाऱ्या राजेंद्र कुरणे यांच्या सासु यांना दिली नव्हती. त्यामुळे त्यांनी लाईटचे बटण चालु केल्याने जाळीस राजेंद्रची मुलगी दुर्वा हीचा हात लागलेने तिचा मृत्यू झाला.

### नाटोलीतील चौघांना मारहाण प्रकरणी शिक्षा

**शिराळा :** नाटोली ( ता. शिराळा) येथील चौघांनी शेतीचे सामाईक हिश्श्यातील शेतातील विहीरीचे पाणी पाजण्याचे कारणावरून दगडाने, लाथाबुक्कयानी मारहाण करून धमकी दिल्याप्रकारणी दोन वर्षाच्या कालावधीसाठी शांतता राखण्यासाठी प्रत्येकी १५,००० रुपयांचा चांगल्या वर्तणूकीचा बाँड व त्याच रक्कमेचा जामीन बॉड व प्रत्येकी १५०० रुपये वर्दीदार यांना दुखापत व नुकसान भरपाई देण्याचा आदेश शिराळा न्यायाधीश एस. ए. सुरजुसे यांनी दिला.

१८ फेब्रुवारी २०२० रोजी विष्णू रामचंद्र नाकील (४२ , नाटोली) यांना आरोपी प्रथमेश नाकील (१८), ऋषीकेश नाकील (२० ), बाजीराव नाकील (५२) नामदेव नाकील (४२, सर्व रा. नाटोली) यांनी सामाईक हिश्श्यातील विहीरीचे पाणी पाजण्याच्या कारणावरून मारहाण करून धमकी दिली होती. याबाबत चौघा आरोपींना शिक्षा सुनावण्यात आली.

### बेळोंडगीत एकावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा





**उमदी :** जत तालुक्यातील बेळोंडगी येथील संगु आमगोंडा हत्तळी याच्यावर उमदी पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्याअंतर्गत ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल झाला असून गावातील विजयकुमार इराप्पा मांग (२१) यांनी उमदी पोलिसात फिर्याद दिली आहे फिर्यादी विजयकुमार मांग हा गावातीलच सुरेश हत्तळी यांच्याकडे गोठ्यात कामासाठी आहे विजयकुमार यास सुरेश हत्तळी यांच्याबद्दल सांगून हत्तळी यांनी चर्चा केली होती. चर्चा फिर्यादी विजयकुमार मांग याने मालक सुरेश हत्तळी यांच्या कानावर घातल्याने सुरेश हत्तळी यांनी सांगू हत्तळी यांना याबाबत फोनवरून विचारणे केले असता सांगू यांनी मी कोणतेही माहिती सांगितली नाही असे सांगून विजयकुमार मांग यांना फोनवरून कन्नड मध्ये अर्वाच भाषेत शिविगाळ करत धमकी दिली. थोड्यावेळाने सांगू हत्तळी हे बोलेरो गाडीतून येऊन सुरेश हत्तळी यांच्या गाईच्या गोठ्यात जाऊन विजयकुमार यास सांगु हत्तळी यांनी मारहाण केली. विजयकुमार यांनी पोलीसात फिर्याद दिली आहे.

---

**सेंट्रल बँक ऑफ इंडिया**
**सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया**
**Central Bank of India**

**वसुली विभाग, क्षेत्रीय कार्यालय, सोलापूर –** १७, येलेश्वर कॉम्प्लेक्स, तरटी नाका पोलीस चौकी जवळ, बाळी वेस, बुधवारपेठ, सोलापूर ४१३ ००३. महाराष्ट्र. फोन : ०२१७–२७२८१३३ ईमेल : recvsolaro@centralbank.co.in

**जोडपत्र IV ए नियम ८ (६) ची तरतूद पहा – स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री वजा ई–लिलाव सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना.**

सामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार (रां) आणि हमीदार (रां) ना ह्याद्वारे देण्यात येत आहे की खाली नमूद स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण ठेवण्यात आल्या होत्या ज्याचा प्रत्यक्ष ताबा सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाच्या (सुरक्षित धनको) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला असून येथे खाली नमूद कर्जदारांकडून आणि हमीदार/ गहाणदारांकडून सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाला (सुरक्षित धनको) देय असलेल्या खाली नमूद रकमेच्या वसुलीसाठी ऑन लाईन वेब पोर्टल (**https:// www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/indes.jsp**) द्वारे २८/१२/२०२३ रोजी जे आहे जेथे आहे , जे आहे जसे आहे आणि जसे आहे तसे आहे. तत्वावर (फर्निचर/ फिक्स्चर/ स्टॉक्स/ चल वगळता) ह्यांची करण्यात येणार आहे. राखीव मूल्य आणि इरठे आणि अन्य तपशिल खालील कोष्टकामध्ये देण्यात आला आहे. विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तीसाठी सुरक्षित धनकोच्या **www.centralbankofindia.co.in** संकेतस्थळावर देण्यात आलेल्या लिंकचा संदर्भ घ्या. इरठे जमा करण्यासाठी शेवटचा **दिनांक २५/१२/२०२३** आहे.

| कर्जदार आणि हमीदार/ गहाणदारांचे नाव | थकीत रक्कम | मालमत्तेचे वर्णन | राखीव रक्कम | इरठे | बोली वाढविण्या–ची रक्कम | अन्य बोझा | भेटीचा दिनांक आणि संपर्क व्यक्तीचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **श्री. दिगंबर रोहिदास आगवणे कर्जदार श्री. अभिजित तुकाराम जाधव हमीदार शाखा: गिरवी** | रु. ४,८८,११,५८१/– अधिक २९.०४.२०१९ पासूनचे व्याज आणि किंमत | १.निवासी प्लॉट : गट क्र. ४९०/२, प्लॉट क्र. ४ नंदाल येथे, ता. फलटण, जिल्हा सातारा, पिन कोड ४१५५२३ **सीमा: पूर्व:** प्लॉट क्र. ५ **पश्चिम :** प्लॉट क्र. ३, **दक्षिण:** अंतर्गत रस्ता **उत्तर:** प्लॉट क्र. १९ आणि २० | रु. १५२३०००/– | रु. १,५२,३००/– | रु. १०,०००/– | बँकेला माहीत नाही | १७/१२/२०२३ शाखा व्यवस्थापक गिरवी ८३९०९०१७०९ |
| | | २. निवासी प्लॉट: गट क्र. ४९०/२, प्लॉट क्र. २० नंदाल येथे, ता. फलटण, जिल्हा सातारा, पिन कोड ४१५५२३ **सीमा : पूर्व:** प्लॉट क्र. १९, **पश्चिम :** प्लॉट क्र. २१, **दक्षिण:** प्लॉट क्र. ४ आणि ३, **उत्तर:** अंतर्गत रस्ता | रु. ७४३०००/– | रु. ७४,३००/– | रु. १०,०००/– | बँकेला माहीत नाही | |
| | | ३. निवासी प्लॉट: गट क्र. ४९०/२, प्लॉट क्र. ३४ नंदाल येथे, ता. फलटण, जिल्हा सातारा, पिन कोड ४१५५२३ **सीमा: पूर्व:** प्लॉट क्र. ३५, **पश्चिम :** प्लॉट क्र. ३३, **दक्षिण:** अंतर्गत रस्ता, उत्तर: प्लॉट क्र. ५१ | रु. ७५५०००/– | रु. ७५,५००/– | रु. १०,०००/– – | बँकेला माहीत नाही | |
| | | ४. निवासी प्लॉट: निवासी प्लॉट: गट क्र. ४९०/२, प्लॉट क्र. ५१ नंदाल येथे, ता. फलटण, जिल्हा सातारा, पिन कोड ४१५५२३ **सीमा: पूर्व:** प्लॉट क्र. ५०, **पश्चिम** : प्लॉट क्र. ५२, **दक्षिण:** प्लॉट क्र ३४, **उत्तर:** अंतर्गत रस्ता | रु. ७५५०००/– | रु. ७५,५००/– | रु. १०,०००/– – | बँकेला माहीत नाही | |
| | | ५. खुला प्लॉट (औद्योगिक एनए प्लॉट) गट क्र. १६२, मौजे घाडगेमळा, ए/पी घाडगेमळा, ता. फलटण, जिल्हा सातारा **सीमा: पूर्व:** गट क्र. १७२ आणि १७३, **पश्चिम :** गट क्र. १६२, **दक्षिण:** गट क्र. १६२ पैकी शिल्लक जमीन आणि गट क्र. १६३, **उत्तर:** गावठाण पुनर्वसन | रु. २,९२,००,०००/– | रु. २९,२०,०००/– | रु. ५०,०००/– | बँकेला माहीत नाही | |
| **श्री. सुहास शामराव तवटे (कर्जदार) श्रीमती मालन सुहास तवटे (सह–कर्जदार) शाखा: सांगली** | रु. २७,९१,०४३/– अधिक २९.११.२०२१ पासूनचे व्याज आणि किंमत | सी.एस. क्र. ५९८ (दक्षिण बाजू) ग्रामपंचायत मिळकत क्र. १३७/१, प्रायमरी शाळे जवळ, एरनडोली खांड जेजुरी रोड, एरंडीली, ता. मिरज, जिल्हा सांगली, पिन ४१६४१० **सीमा: पूर्व:** सीटीएस क्र. ५९९, **पश्चिम:** रोड, **दक्षिण:** सीटीएस क्र. ५९४, **उत्तर:** कैकाडी ह्यांच्या मालकीच्या मालमत्तेचा शिल्लक भाग | रु. २९,४२,०००/– | रु. २,९४,२००/– | रु. २०,०००/– | बँकेला माहीत नाही | १७/१२/२०२३ शाखा व्यवस्थापक सांगली ९९२३२००३५६ |

उपरोक्त नमूद दिनांकाला करण्यात येणाऱ्या सदर ई–लिलाव विक्रीच्या संदर्भात कर्जदार/ हमीदारांना सिक्युरिटी (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८(६) / नियम ९(१) अंतर्गत सूचना म्हणून देखील समजण्यात यावे.

ई–लिलाव विक्रीमध्ये सहभागी होण्यासाठी, इच्छुक बोलीदारांनी त्यांचे तपशील सेवा प्रदात्याकडे **https://mstcecommers.com/auctionhome/ibapi/index.jsp** वर अगोदर नोंदवले पाहिजेत आणि त्यांना वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मिळेल. इच्छुक बोलीदारांनी फक्त पासवर्ड बदलण्याचा सल्ला दिला. शैक्षणिक व्हिडिओंसाठी बोलीदार **https://mstcecommers.com/auctionhome/ibapi/index.jsp** ला भेट देऊ शकतात. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया बँकेच्या वेबसाइटवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या**: www.centralbankofindia.co.in.**

बोलीदारांनी **https://mstcecommers.com/auctionhome/ibapi/index.jsp** ह्या संकेतस्थळावर नोंदणी करावी आणि केव्हायसी कागदपत्रे अपलोड करावीत आणि सेवा प्रदात्याकडून केव्हायसी कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर,इरठे एनईएफटी/ट्रान्स्फर द्वारे ग्लोबल ईएमडी वॉलेटमध्ये जमा करण्यात यावे (जनरेशन नंतर चलनासाठी **https://mstcecommers.com/auctionhome/ibapi/index.jsp.**)

अधिक माहितीसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, **(१) प्राधिकृत अधिकारी, क्षेत्रीय कार्यालय, सोलापूर, मोबाईल क्र. ९३३६२३११६५, (२) गिरवी शाखा, शाखा व्यवस्थापक ८३९०९०१७०९ आणि सांगली शाखा, शाखा व्यवस्थापक मोबाईल क्रमांक ९९२३२००३५६** यांच्याशी संपर्क साधा.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या तरतुदींनुसार अटी आणि शर्ती काटेकोरपणे असतील.

**मालमत्तांसाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८(६)/ नियम ९(१) अंतर्गत वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना**

**दिनांक: ०९/११/२०२३ ठिकाण: : सोलापूर** **सही/–, प्राधिकृत अधिकारी**

---



## THE UGAR SUGAR WORKS LTD.

Regd. Office : Mahaveernagar, Sangli 416416 | CIN No: L15421PN1939PLC006738

- Administrative Offices : Ugarkhurd 591316 (Dist. Belgavi)
- Factories : Ugarkhurd (Dist. Belgavi) and Nagarhalli-Malli Village (Dist. Kalburgi)

**STATEMENT OF UNAUDITED STANDALONE AND CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER / HALF YEAR ENDED 30th SEPTEMBER, 2023**

*(Rs. in Lakhs)*

| | Particulars | STANDALONE | | | CONSOLIDATED | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended 30-09-23 (Unaudited) | Previous Year Ending 31-03-23 (Audited) | Corresponding 3 Months ended in the previous year 30-09-22 (Unaudited) | Quarter Ended 30-09-23 (Unaudited) | Previous Year Ending 31-03-23 (Audited) | Corresponding 3 Months ended in the previous year 30-09-22 (Unaudited) |
| 1. | Total Income from Operations (Net) | **26,578.50** | 1,94,014.95 | 28,989.65 | **26,578.50** | 1,94,014.95 | 28,989.65 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period (before tax, Exceptional and / or Extraordinary items) | **(3,239.73)** | 14,838.52 | (1,221.54) | **(3,239.52)** | 14,839.24 | (1,221.21) |
| 3. | Net Profit / (Loss) for the period after tax, (after Exceptional and / or Extraordinary items) | **(3,320.01)** | 10,304.68 | (1,348.34) | **(3,319.80)** | 10,304.80 | (1,348.01) |
| 4. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax) | **(3,266.72)** | 10,187.40 | (1,322.68) | **(3,266.51)** | 10,188.45 | (1,322.35) |
| 5. | Equity Share Capital | **1,125.00** | 1,125.00 | 1,125.00 | **1,125.00** | 1,125.00 | 1,125.00 |
| 6. | Other Equity | Rs.20845.98 Lakhs - 31-03-2023 | | | Rs.20958.44 Lakhs - 31-03-2023 | | |
| 7. | Earnings per share of Re. 1/- each (for continued and discontinued business) Basic and Diluted | **(2.95)** | 9.16 | (1.20) | **(2.95)** | 9.16 | (1.20) |

***Notes:***

***1)*** The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing and Other Disclosures Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results is available on the Stock Exchange websites (www.bseindia.com & www.nseindia.com) and Company's website (www.ugarsugar.com)

***2)*** The above results are reviewed by the Audit Committee and were approved and taken on record by the Board of Directors at its meeting held on 08-11-2023.

**For The Ugar Sugar Works Ltd.**

**Place: Ugarkhurd**

**Date: 08-11-2023**

**Chandan S. Shirgaokar**
Managing Director
**DIN - 208200**

Nupur Ads



शनिवार दि. ११ नोव्हें. २०२३ रोजी पहाटे ६.०० वा.
केशवराव भोसले नाट्यगृह, कोल्हापूर

गुणीदास फाउंडेशन, कोल्हापूर
आयोजित

दिवाळी पहाट


आनंदी जोशी


विघ्नेश जोशी


हृषिकेश रानडे

साथ-संगत
◆ बासरी : सचिन जगताप ◆ व्हायोलीन : केदार गुळवणी ◆ की-बोर्ड : विक्रम पाटील
◆ तबला : आशय कुलकर्णी ◆ हार्मोनियम : स्वरुप दिवाण ◆ तालवाद्य : अनिकेत ससाणे, गुरु ढोले
◆ ध्वनिव्यवस्था : संदिप चव्हाण ◆ रंगमंच व्यवस्था : मिलिंद अष्टेकर

मुख्य प्रायोजक: तनिष्क TATA ची पेशकश
सहप्रायोजक: Kajave Furniture; लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
रेडिओ पार्टनर

लकी ड्रॉ ✻ प्रश्नमंजुषा ✻ आकर्षक बक्षीसे ✻
प्रवेशिका गुणीदास फाउंडेशन, खासबाग इथे मिळतील.
काही जागा निमंत्रितांसाठी राखीव. ✻ विनामूल्य प्रवेश अग्रक्रमानुसार. संपर्क : ९८२२९८११००



॥श्री॥



॥ रामायण ॥



तपस्यासिद्धी वार्षिक स्नेहसंमेलन

११५ विद्यार्थ्यांसह भरतनाट्यम नृत्यशैली मधून रामायण चे मुख्य प्रसंग साकारणार आहेत. वय वर्ष ५ पासून ५६ पर्यंतचे हे विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत.

दि. ९ नोव्हेंबर, २०२३
स्थळ: संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह
वेळ: ५.३० वा.

सहकार्य: आनंद कुलकर्णी
कलाकार : तपस्यासिद्धी स्कूल ऑफ भरतनाट्यमचे विद्यार्थी


## पलूस शिक्षण प्रसारक मंडळ पलूस,

मु.पो.पलूस, ता. पलूस, जि.सांगली, पिन ४१६३१० (महाराष्ट्र राज्य) मो.९१४६५९२६२५, ९१७५९७२१२७ Email-pspm2020@gmail.com

जावक क्र. एस-९२/२०२३-२०२४ दि. ०८/११/२०२३

### - विशेष सर्वसाधारण सभा नोटीस -

पलूस शिक्षण प्रसारक मंडळ पलूसच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविणेत येते की, आपल्या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा **गुरुवार दि. ३० / ११ / २०२३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता** संस्थेच्या स्टेडिअम हॉल पलूस येथे बोलविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेत उपस्थित रहावे. ही विनंती.

**- सभेपुढील विषय -**

१) आजच्या सभेच्या मा. अध्यक्षांची निवड करणे.
२) मागील सभेचे प्रोसिडींग वाचुन कायम करणे.
३) सन २०२३ ते २०२८ या कालावधीकरिता निवडणूकीने निवडण्यात आलेल्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यांची नावे जाहीर करुन त्यास मान्यता देणे.
४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणा-या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे. ठिकाण - संस्थेचा स्टेडिअम हॉल, पलूस.

दिनांक - ०८/११/२०२३
(शिक्का)

सही/- **श्री. धोंडीराम प्रताप शिंदे**
सचिव पलुस शिक्षण प्रसारक मंडळ,
पलूस ता. पलूस, जि. सांगली

टिप - १) वरील सभा कोरम अभावी तहकुब झालेस सदरची सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी १ तासाने घेणेत येईल त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही. २) सर्व सभासदांनी स्वत:चे आधार कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. ३) निवडणूक कार्यकम पत्रिका व निवडणूकी संदर्भातील नियम संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आलेले आहेत.

॥ तमसो मा ज्योतिर्गमय ॥

## पलूस शिक्षण प्रसारक मंडळ, पलूस

जि. सांगली पिन ४१६३१०

**सन २०२३ ते २०२८ करिता पंचवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम**

| दिनांक | तपशिल | वेळ व ठिकाण |
|---|---|---|
| १०/११/२०२३ | मतदार यादी प्रसिद्ध करणे | दु. ४ वा संस्था कार्यालय |
| ११/११/२०२३ | मतदार यादी हरकत | सकाळी ११ ते ०२ संस्था कार्यालय |
| १३/११/२०२३ | हरकतीवर निर्णय | दु. ३ वा संस्था कार्यालय |
| १३/११/२०२३ | अंतीम मतदार यादी प्रसिद्ध | दु. ४ वा संस्था कार्यालय |
| १५/११/२०२३ ते १८/११/२०२३ | उमेदवारी अर्ज विक्री व स्विकृती | सकाळी ११ ते ०२ संस्था कार्यालय |
| २०/११/२०२३ | प्राप्त उमेदवारी यादी प्रसिद्ध करणे | दु. ४ वा संस्था कार्यालय |
| २१/११/२०२३ | प्राप्त उमेदवारी अर्जाची छाननी | सकाळी ११ ते ०२ संस्था कार्यालय |
| २१/११/२०२३ | पात्र उमेदवारी यादी प्रसिद्ध करणे | दु. ३ वा संस्था कार्यालय |
| २३/११/२०२३ | उमेदवारी अर्ज माघार घेणे | सकाळी ११ ते ०२ संस्था कार्यालय |
| २४/११/२०२३ | अंतिम उमेदवारी यादी प्रसिद्ध करणे. | दु. ४ वा संस्था कार्यालय |
| २५/११/२०२३ | चिन्ह वाटप | सकाळी ११ ते ३ |
| ३०/११/२०२३ | मतदान | सकाळी ११ ते ०३ संस्था कार्यालय |
| ३०/११/२०२३ | मतमोजनी | दु. ४ वा संस्था कार्यालय |
| ३०/११/२०२३ | निकाल | सायं. ५ वाजता विशेष सर्वसाधारण सभेत निकाल जाहीर |

**सही/–निवडणूक निर्णय अधिकारी**
**पलूस शिक्षण प्रसारक मंडळ, पलूस**